आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

७ डिसेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती दौपदी मुर्मु यांच्या हस्ते आज ओडीशात तीन रेल्वे मार्गाचं भूमीपूजन
- संरक्षण मंत्री राजनाथसिंह उद्यापासून तीन दिवसांच्या रशियाच्या दौऱ्यावर
- महाराष्ट्र विधिमंडळाच्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनाला सुरुवात, ९ तारखेला अध्यक्षांची निवड
- सक्तवसुली संचालनालयाचे अहमदाबाद आणि मुंबईत ७ ठिकाणांवर छापे साडे तेरा कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त

  **आणि**
- बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाची भारतावर आतापर्यंत शतकी आघाडी.

**<><><><><>**

राष्ट्रपती दौपदी मुर्मु यांनी आज ओडिशात तीन रेल्वे मार्गाचं भूमीपूजन केलं. यात बांगडीपोसी ते गौमाहीसानी, बडमपहाड ते केदूरझागढ आणि बुडामोरा ते चाकुलिया या रेल्वेमार्गांचा समावेश आहे. हे तीन्ही रेल्वेमार्ग मयूरभंज जिल्ह्यातल्या बांगरीपोसी इथं आहेत. राष्ट्रपती आज पाच दिवसांचा ओडिशा दौरा संपवून दिल्लीला परतणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्थेच्या कार्यकर सुवर्ण महोत्सव कार्यक्रमाला दूरस्थ पद्धतीनं संबोधित करणार आहेत. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम इथं होणाऱ्या या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल,

मंत्रिमंडळाचे इतर सदस्य उपस्थित राहतील. जगभरातल्या ३० देशांमधले एक लाखापेक्षा जास्त कार्यकर्ते या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

<><><><><>

देशभरात ८५ नवीन केंद्रीय विद्यालयं सुरू करण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. जास्तीत जास्त लोकांना शालेय शिक्षण मिळावं यासाठी सरकारनं हा मोठा निर्णय घेतल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. अनेक विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार असून रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होतील असं ते म्हणाले.

<><><><><>

देशभरात दळणवळणाच्या सुविधा सुधारण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्यातल्या रिठाला-कुंडली कॉरिडॉरला मंजुरी मिळाल्यानं दिल्ली ते हरयाणा दरम्यानचा प्रवास सोपा होईल असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. चार वर्षांत पूर्ण होणाऱ्या दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्यांतर्गत या कॉरिडॉरला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली होती.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथसिंह उद्यापासून तीन दिवसांच्या रशियाच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात ते रशियाचे संरक्षणमंत्री आंद्रे बेलोसोव्ह यांच्याबरोबर २१व्या भारत रशिया सरकारस्तरावरील चर्चेत सहभागी होणार असून यावेळी त्यांच्यात संरक्षण आणि संरक्षण उद्योग यातल्या सहकार्यावर चर्चा होणार आहे. राजनाथ सिंह सोमवारी लेनिनग्राड इथं भारतीय नौसेनेच्या क्षेपणास्त्रधारी आयएनएस तुशील या युद्धनौकेचं कमिशन करतील. यावेळी नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठीही उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्यात संरक्षण मंत्री रशियातल्या भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत विविध शेतकरी संघटना आणि आघाडीच्या कृषी अर्थतज्ज्ञांशी अर्थसंकल्पपूर्व दुसरी चर्चा झाली. या बैठकीला अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते.

<><><><><>

केंद्रीय वीज, गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते आज आंध्र प्रदेशातल्या विजयवाडा इथं ऊर्जावीर योजनेला सुरुवात होत आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. देशात ऊर्जेविषयी जागरुकता निर्माण करून अपारंपरिक ऊर्जेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं ही योजना सुरु करण्यात आली आहे. यावेळी मनोहर लाल शहर विकास आणि वीजनिर्मिती या मुद्द्यांवर राज्यातल्या अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत.

<><><><><>

महाराष्ट्र विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाला आज मुंबईत सुरुवात झाली. विधानसभेच्या अध्यक्षांची निवड येत्या ९ तारखेला होणार असून यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची वेळ रविवारी दुपारी बारा वाजेपर्यंत ठरवण्यात आल्याची घोषणा विधानसभेचे तात्पुरते अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी केली. यानंतर चैनसुख संचेती, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे आणि आशीष जयस्वाल या सदस्यांना शपथ देण्यात आली. हे चौघे कोळंबकर यांच्यासोबत तालिका सदस्य म्हणून कामकाज पाहतील. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना आमदारकीची शपथ देण्यात आली. आज आणि उद्या असे दोन दिवस नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होणार आहे.

<><><><><>

सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज भारतीय सैन्य दलाच्या धैर्य, पराक्रम, समर्पण आणि त्यागाला वंदन केलं. आजचा दिवस भारतीय सशस्त्र सेना दलाच्या पराक्रमाचा आणि हौतात्म्याचा सन्मान करण्यासाठी पाळला जात असल्याचं सिंह यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. देशाच्या संरक्षणात महत्वाची भूमिका निभावणाऱ्या सशस्त्र सेना दलाच्या कार्याची संरक्षण मंत्र्यांनी प्रशंसा केली आहे. देशवासीयांनी सशस्त्र सेना ध्वज दिन फंडात योगदान द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालयानं आज अहमदाबाद आणि मुंबईत ७ ठिकाणांवर छापे टाकून साडे तेरा कोटी रुपयांची रोकड जप्त केली. बँक ऑफ महाराष्ट्र आणि नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत असलेल्या खात्यांद्वारे करण्यात आलेल्या डेबिट व्यवहारांच्या तपासात शेकडो कोटी रुपयांचे व्यवहार विविध कंपन्यांकडे हस्तांतरित करण्यात आल्याचं आढळलं आहे. तसचं विविध डमी संस्थांच्या

खात्यातून शेकडो कोटी रुपयांची रोकड काढून ती अहमदाबाद, मुंबई आणि सुरत इथं हवाला ऑपरेटर्सना वाटण्यात आली. नोव्हेंबरमध्ये नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मालेगाव शाखेवर या प्रकरणात टाकलेल्या छाप्यांच्या अनुषंगानं ही कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या शालेय शिक्षण विभागानं थंड भागातल्या उच्च माध्यमिक स्तरापर्यंतच्या सर्व सरकारी आणि मान्यताप्राप्त खासगी शाळांना हिवाळी सुट्टी जाहीर केली आहे. या आदेशानुसार पाचवीपर्यंतचे वर्ग १० डिसेंबर ते २८ फेब्रुवारी आणि सहावी ते बारावीचे वर्ग १६ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी दरम्यान बंद राहणार आहेत.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंमली पदार्थ नियंत्रण आयोगाच्या ६८ व्या सत्राचं अध्यक्षपद भारत भूषवणार आहे. ऑस्ट्रियाची राजधानी विएना इथं संयुक्त राष्ट्रसंघाचे भारताचे स्थायी प्रतिनिधी शंभु कुमारन यांनी काल आयोगाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्विकारला. भारताला पहिल्यांदाच या आयोगाच्या अध्यक्षपदी निवडण्यात आलं आहे. हा आयोग जागतिक स्तरावर अंमली पदार्थांविषयी प्रकरणांवर लक्ष ठेऊन त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनं सदस्य राष्ट्रांना धोरण ठरवण्यासाठी मदत करत असतो.

<><><><>

देशव्यापी क्षयरोग निर्मूलन अभियानाला आजपासून सुरुवात होत आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते हरयाणातील पंचकुला इथं या मोहिमेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. देशभरातील ३३ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतील मिळून ३४७जिल्ह्यांत पुढील १०० दिवस ही मोहिम राबवली जाणार आहे. या मोहिमेत, क्षयरोगाचे नवीन रुग्ण शोधणं, गंभीर आजारी असलेल्या क्षयरोग्यांसाठी आधुनिक उपचार, तसंच पोषक आहार देण्यावर भर देण्यात येणार आहे.

<><><><>

केंद्रसरकार, शेतकऱ्यांना येणाऱ्या उत्पादन खर्चाच्या 50 टक्क्यांहून अधिक किमान आधारभूत किंमत निश्चित करून शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करेल असं आश्वासन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल दिलं. राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर देताना चौहान बोलत होते. शेतमालाला किफायतशीर भाव मिळावा यासाठी केंद्रसरकार कटिबद्ध असल्याचं सांगून, अर्थसंकल्पातही कृषी क्षेत्रासाठीच्या तरतुदीत, २०१३-१४ च्या तुलनेत आता १ लाख २२ हजार ५२८ कोटी रुपयांची अभूतपूर्व वाढ केल्याचं त्यांनी नमूद केलं.

<><><><>

पश्चिम आशियाई देशातली सद्यस्थिती लक्षात घेता, पुढील सूचना मिळेपर्यंत भारतीय नागरिकांनी सीरियाचा प्रवास टाळण्याचा तसंच शक्य असल्यास सिरियातून बाहेर पडण्याचा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिला असून, याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

<><><><>

ॲडलेड ओव्हल इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा

ऑस्ट्रेलियाचा संघ ६ गडी बाद २९१ धावांवर खेळत आहे. काल १ गडी बाद, ८६ धावांवरून पुढे खेळायला सुरुवात करून ऑस्ट्रेलियाच्या संघानं भारतावर १११ धावांची आघाडी घेतली आहे. या कसोटीच्या पहिल्या दिवशी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर भारताची फलंदाजी गडगडली आणि भारताचा संपूर्ण संघ १८० धावांवर तंबूत परतला. पाच कसोटी सामन्यांच्या या मालिकेत सध्या भारत १-०नं पुढे आहे. पर्थ इथं झालेल्या पहिल्या कसोटीत भारतानं ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी मोठा विजय मिळवला होता.